दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990
लातूर वर्ष ४ थे अंक १०९ वा बुधवार दि.०२ ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## मतदार संघातील हुतात्मा स्मारकांच्या दुरुस्तीसाठी ८ कोटी रूपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता

### क्रीडा व युवक कल्याण बंदरे मंत्री संजय बनसोडे यांची माहिती

उदगीर :- स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाडा हैदराबाद संस्थानचा एक भाग होता. मराठवाड्याच्या जनतेला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी हैद्राबादच्या निजामा विरोधात दीर्घ लढा द्यावा लागला व दि. १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या राजवटीतून मुक्त झाला. या मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यात शहीद झालेल्या स्वातंत्र्य योद्धांच्या स्मृती प्रित्यर्थ उदगीर मतदार संघातील उदगीर तालुक्यातील तोंडचिर कवळखेड तर जळकोट तालुक्यातील घोणशी व तिरुका येथे बांधलेल्या हुतात्मा स्मारकांच्या दुरुस्तीसाठी काल महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातून ७ कोटी २५ लक्ष ७६ हजार रुपयाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिली आहे. नवीन पिढीला मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचा इतिहास अवगत करणे महत्वाचे असून येत्या काळात मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास हा अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना विनंती करणार असल्याचे ही ना. संजय बनसोडे यांनी सांगितले आहे. मुक्तीसंग्रामामध्ये बलिदान दिलेल्या स्वातंत्र्यवीरांना स्मरण करण्यासाठी हुतात्मा स्मारकाच्या दुरुस्तीसाठी ८ कोटींची तरतुद केली आहे तर उदगीर तालुक्यातील तोंडचिर येथील रामघाट तांड्याजवळ तब्बल १ कोटींचे प्रवेशद्वार उभारत आहोत. आपला मतदार संघ हा मागील काळात विकासापासून वंचित होता. मात्र



मागील ५ वर्षात विकासात पुढे आणण्यासाठी आपण प्रयत्न करुन या तालुक्याचा कायापालट केला. भौतिक सुविधा पुरविण्यावर भर देवून त्यात रस्ते, वीज, आरोग्य, पाणी या समस्या प्रामुख्याने सोडविल्या. जलसंधारणासह विविध विभागाच्या मार्फत मोठा निधी मतदार संघात खेचुन आणला. यापुढे ही उदगीर जिल्हा निर्मितीसाठी जे करावे लागेल ते करणार असल्याचे ना.संजय बनसोडे यांनी सांगितले.

## लाडक्या बहिणींचे पैसे कापणा-या बँकांवर कारवाई

मुंबई : मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ दरमहा पात्र महिलांना देण्यात येत आहे. या लाभातून काही बँका मिनिमम बॅलन्स,




ईसीएस मँडेट रिटर्न, चेक रिटर्न यासारखे शुल्क आकारून महिलांच्या बँक खात्यातील लाभाची रक्कम कपात करतात. सेवा शुल्काच्या नावाखाली रक्कम कपात करणा-या अशा बँकांवर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती महिला आणि बाल विकासमंत्री आदिती तटकरे यांनी मंगळवारी येथे दिली. आदिती तटकरे यांनी आज मंत्रालयात मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेचा राज्यस्तरीय आढावा बैठक घेतला. या बैठकीत बोलताना तटकरे यांनी, काही पात्र महिलांच्या बँक खात्याला आधार सिडींग नसल्याने लाभ मिळत नाही. याबाबत अंगणवाडी सेविका, मदतनिस यांच्या मदतीने २ ते ७ ऑक्टोबर या कालावधीत विशेष मोहीम राबवावी. बँकेशी संबंधित अडचणी संदर्भात स्थानिक पातळीवर बैठका घ्याव्यात, अशा सूचना बैठकीत उपस्थित जिल्हा महिला आणि बाल विकास अधिका-यांना दिल्या. नांदेड जिल्ह्यात प्रत्यक्षात अर्ज भरताना लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरले आणि पुरुषांचे आधार क्रमांक, खाते क्रमांक दिले गेल्याने पुरुषांच्या बँक खात्यात पैसे जमा झाले. याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर या फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल करून ज्या केंद्रावर हे अर्ज भरले गेले त्या केंद्र चालकाविरुद्धही गुन्हा दाखल करण्याचे निर्देश तटकरे यांनी या वेळी दिले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंतर्गत आतापर्यंत २ कोटी ४० लाख महिलांची नोंदणी झाली असून १ कोटी ८७ लाख पात्र महिलांना लाभ देण्यात आला आहे.

## लातूर ग्रामीण भाजपाकडेच राहील मागील चूक यावेळी होणार नाही भाजपा पक्षनिरीक्षक माजी मंत्री बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन

### आ. कराड यांनाच उमेदवारी द्यावी पक्षपदाधिकारी, लोकप्रतिनीधींची मागणी

लातूर : - लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात गेल्यावेळी भाजपाचा विजय निश्चित होता मात्र काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्यात छुपा समझोता झाल्याने हा मतदार संघ सेनेच्या वाट्याला गेला. मागील चूक यावेळी होणार नाही. येणाऱ्या निवडणुकीत लातूर ग्रामीण भाजपचाच असेल आणि भाजपाच ताकतीने निवडणूक लढवेल असे भाजपाचे पक्ष निरीक्षक माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी बोलून दाखविले. दरम्यान लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून आ. रमेशआप्पा कराड यांनाच भाजपाने उमेदवारी द्यावी अशी एकमुखी मागणी मतदार संघातील जवळपास सर्वच पक्ष पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी यावेळी केली.






लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून भाजपा पक्षाची उमेदवारी कोणाला देण्यात यावी यासाठी पक्षाचे निरीक्षक माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी मंगळवारी दुपारी भाजपाच्या संवाद कार्यालयात पक्ष पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडून व्यक्तिगत संवाद साधून प्रत्येकाची भावना जाणून घेतली. यावेळी बहुतांशी पक्षाच्या पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी आ. रमेशआप्पा कराड यांनाच लातूर ग्रामीण मतदार संघातून उमेदवारी देण्यात यावी अशी एकमुखी मागणी पक्ष निरीक्षक बबनराव लोणीकर यांच्याकडे केली. तत्पूर्वी उपस्थित कार्यकर्त्यांना माजी मंत्री लोणीकर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, रेणापूर तालुका अध्यक्ष दशरथ सरवदे यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, विविध समितीचे सदस्य प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काँग्रेसच्या कार्यकाळात लातूर जिल्ह्याने देश आणि राज्य पातळीवरील मोठ मोठी पदे मिळून दीर्घकाळ सत्ता उपभोगली तरीही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली निघाला नाही. देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी अनेक लोककल्याणकारी योजना राबविल्या, देशाच्या सर्वांगीण विकास कामाचे अनेक उच्चांक निर्माण केले. मात्र गेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला अपेक्षित यश मिळाले नसल्याची खंत व्यक्त करून यावेळी बोलताना बबनराव लोणीकर म्हणाले की, आपण खूप कामे केली मात्र बोलून दाखवत नाहीत. काँग्रेस आघाडी संविधान बदलणार यासह विविध खोट्या विषयात मतदारात संभ्रम निर्माण करण्यात यशस्वी ठरली. मराठा - ओबीसी यांच्यात वाद लावण्यात यशस्वी झाले असेही त्यांनी बोलून दाखविले.

काँग्रेस विकास आघाडी पेक्षा राज्यातील महायुती शासनाने शंभर पट्टीने अधिक काम केले आहे. लाडकी बहीण, शेतकरी सन्मान योजना, शेतीचे विज बिल माफ, महिलांना प्रवासात सवलत एक रुपयात पिक विमा, मागेल त्याला गाय गोटे, विहिरी, मोफत राशन यासह अनेक योजना सुरू केले. या सर्व योजनेचा असंख्य लाभार्थ्यांना लाभ मिळाला असून याची जाणीव कार्यकर्त्यांनी करून दिली पाहिजे असे सांगून लोणीकर म्हणाले की, लातूर ग्रामीण भाजपाचा बाले किल्ला आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत ही जागा भाजपाने लढवली असती तर निश्चितपणे एक भाजपचा आमदार वाढला असता, मागील वेळी झालेली चूक यावेळी होणार नाही. लातूर ग्रामीणची जागा भाजपाकडेच असेल आणि ताकतीने लढवेल असेही त्यांनी बोलून दाखविले.

प्रारंभी अँड. दशरथ सरवदे यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून झालेल्या विविध विकास कामाची माहिती देऊन येणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी आ. रमेशआप्पा कराड यांनाच उमेदवारी देण्यात यावी अशी आग्रहाची मागणी केली. बैठकीचे सुत्रसंचलन चंद्रकांत कातळे यांनी केले. बैठकीनंतर पक्ष निरीक्षक बबनराव लोणीकर यांनी बहुसंख्य भाजपाच्या लोकप्रतिनिधी पदाधिकारी यांच्याशी व्यक्तिगत संवाद साधून त्यांच्या भावना जाणून घेतल्या.

### घड्याळ चिन्हावरून सर्वोच्च न्यायालयाची 'तारीख पे तारीख'

नवी दिल्ली : राज्यात विधानसभा निवडणुकांची घोषणा काहीच दिवसात होऊ शकते. सर्व पक्षांनी यासाठी तयारी सुरु केली आहे. जागावाटपाच्याही चर्चा सुरु आहेत. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षाला दिलेल्या चिन्ह आणि नावाच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात शरद पवार गटाने सुप्रीम कोर्टात धाव घेतली. तेव्हापासून खटला सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहे. आज चिन्हाबाबतीत सुनावणी होणार होती. पण आता पुन्हा ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. आता सुप्रीम कोर्टात ही सुनावणी १५ ऑक्टोंबर रोजी होणार आहे. राष्ट्रवादीतील आमदार अपात्र आणि घड्याळ चिन्हाबाबतची सुनावणी सुप्रीम कोर्टाने पुढे ढकलली आहे. ही सुनावणी १५ ऑक्टोंबरपर्यंत पुढे ढकलली आहे. या सुनावणीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला घड्याळ चिन्ह कायम राहणार की पुन्हा नवीन चिन्ह मिळणार हे स्पष्ट होणार आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उदगीर येथील विविध इमारती, विकास कामांचे लोकार्पण










उदगीर :- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज उदगीर येथील विविध विकास कामांचे उद्घाटन करण्यात आले. शहरातील सुसज्ज प्रशासकीय इमारती, अटल अमृत उदगीर शहर पाणी पुरवठा योजना, कौळखेड व गुडसूर येथील वीज उपकेंद्रांचा यामध्ये समावेश आहे. तसेच उदगीर शहरातील भूमिगत गटार योजनेचे यावेळी भूमिपूजन करण्यात आले. राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आमदार विक्रम काळे, आमदार बाबासाहेब पाटील, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी सोहेल खान, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता बी. एस. पांढरे, अधिक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, माजी आमदार गोविंद केंद्रे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहूल केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, उदगीर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

तहसील व उपविभागीय अधिकारी कार्यालय

उदगीर येथे नव्याने उभारण्यात आलेल्या तहसील कार्यालय व उपविभागीय कार्यालय इमारतीचे उद्घाटन उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते झाले. या इमारतीचे एकूण क्षेत्रफळ सुमारे २ हजार ८७६ चौरस मीटर आहे. यामध्ये तळ मजल्यावर वाहनतळ (पार्किंग), पहिल्या मजल्यावर तहसीलदार यांचा कक्ष, कॉन्फरन्स हॉल, कोर्ट रूम यासह विविध कक्ष, दुसऱ्या मजल्यावर अभिलेख कक्ष, ईव्हीएम स्ट्राँग रूम, बैठक सभागृह आणि इतर कक्ष आहेत. तिसऱ्या मजल्यावर उपविभागीय अधिकारी कार्यालय असून उपविभागीय अधिकारी यांच्या कक्षासह विविध कक्ष, कोर्ट रूम, कॉन्फरन्स हॉल आहे. या इमारतीसाठी सुमारे १० कोटी १९ लाख रुपये खर्च झाला आहे.

पंचायत समिती इमारत

उदगीर पंचायत समितीच्या नूतन इमारतीमध्ये एकूण चार मजले आहेत. एकूण जवळपास ३ हजार ११२ चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या या इमारतीची उभारणी सुमारे २० कोटी १७ लक्ष रुपये निधीतून करण्यात आली आहे. गट विकास अधिकारी यांच्यासह विविध अधिकारी, पदाधिकारी यांचे सुसज्ज कक्ष, बैठक सभागृह या इमारतीमध्ये तयार करण्यात आले आहेत.

उदगीर प्रशासकीय इमारत

उदगीर येथे सुमारे १४ कोटी ९५ लाख रुपये निधीतून तीन मजली प्रशासकीय इमारत उभारण्यात आली आहे. या इमारतीचे एकूण बांधकाम क्षेत्रफळ सुमारे ५ हजार ५३२ चौरस मीटर असून तळ मजल्यावर वाहन तळ आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, वन विभाग, राज्य उत्पादन शुल्क, सहाय्यक दुय्यम निबंधक, कृषि विभागासह विविध शासकीय विभागांची कार्यालये या तीन मजली प्रशासकीय इमारतीमध्ये असतील.

उदगीर उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस स्टेशन इमारत

उदगीर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आणि उदगीर पोलीस स्टेशनसाठी सुमारे ३२ कोटी ५४ लक्ष निधीतून दोन मजली इमारत उभारण्यात आली आहे. या इमारतीचे एकूण क्षेत्रफळ जवळपास १० हजार ९५७ चौरस मीटर आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते फीत कापून व कोनशिलेचे अनावरण करून या इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. या इमारतीमध्ये तळमजला व पहिल्या मजल्यावर उदगीर शहर पोलीस स्टेशन आहे. तर दुसऱ्या मजल्यावर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आहे. ही इमारत भूकंप रोधक असून सोलार, अग्निशमन यंत्रणा, अत्याधुनिक कारागृह, बैठक कक्ष, ठाणे अंमलदार कक्ष आदी सुविधांनी सज्ज आहे.

गुडसुर आणि कौळखेड वीज उपकेंद्राचे लोकार्पण

गुडसुर आणि कौळखेड येथे उभारण्यात आलेल्या ३३/११ केव्ही वीज उपकेंद्रांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे लोकार्पण केले. गुडसुर येथील उपकेंद्रामुळे गुडसुर, डाऊळ, हिप्परगा, डोंगरशेळकी, कल्लुर व इस्मालपुर येथील ग्राहकांना सुरळीत आणि योग्य दाबाने विद्युत पुरवठा करणे शक्य झाले आहे. तसेच कौळखेड येथील उपकेंद्रामुळे जानापुर, शिरोळ, कौळखेड, मल्लापुर, गुर्धाळ, कुमदाळ व जवळपासच्या वाड्या-तांडे यांना उच्च दाबाने वीज पुरवठा होत आहे.

अटल अमृत उदगीर शहर पाणी पुरवठा योजनेचे लोकार्पण

उदगीर शहरासाठी पुढील ३० वर्षांची लोकसंख्या गृहीत धरून अटल अमृत उदगीर शहर पाणी पुरवठा योजनेच्या १०६ कोटी रूपयांच्या कामांना मंजूरी देण्यात आली. या योजनेसाठी नांदेड जिल्हातील उर्ध्व मण्यार प्रकल्पातील पाणी आरक्षित करण्यात आले. तसेच याठिकाणी उद्भव विहीर घेवून उदगीर शहरासाठी पाणी आणण्यात आले. या योजनेतून शहरात सुमारे १४ हजार नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच बनशेळकी तलाव व हकनकवाडी जलशुध्दीकरण केंद्र येथे ५०० के. व्ही. क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आले आहेत. या योजनेचे लोकार्पण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने झाले.

उदगीर शहर भूमिगत गटार योजनेचे भूमिपूजन

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत उदगीर शहर भूमिगत गटार योजनेच्या एकूण सुमारे ३४९ कोटी ८८ लाख रूपयांच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार उदगीर शहर भूमिगत गटार योजनेच्या टप्पा-१ साठी १६१ कोटी ४ लक्ष रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या कामाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले.

## संपादकीय....

# भरभराट नरबळी

शाळेत शिक्षण मिळतं. शिक्षणामुळं अज्ञानाचा अंधकार दूर होतो. सत्य दिसू लागतं आणि त्यामुळं मनातल्या वेडगळ, जुनाट अंधश्रद्धा दूर होतात. अमानवी रूढी संपुष्टात येतात, असा सर्वसाधारण प्रवास आहे. पण शाळा काढणार्याच्याच डोक्यातून वेडगळ समजुती जात नसतील, तर काय घडतं? हाथरस पुन्हा एकदा हाथरस! १४ सप्टेंबर २०२० रोजी घडलेलं सामूहिक अत्याचार आणि हत्या प्रकरण, काही महिन्यांपूर्वी भोलेबाबाच्या सत्संगावेळी झालेल्या चेंगराचेंगरीत १२१ लोकांचा मृत्यू अशा घटनांनंतर उत्तर प्रदेशातील हाथरस जिल्हा आता शाळेतील कथित नरबळी प्रकरणामुळं चर्चेत आलाय. आनंददायी शिक्षणासाठी २००९ मध्ये शिक्षणाधिकार कायदा करण्यात आला.

परंतु उत्तर प्रदेशात शाळांच्या संदर्भात सातत्यानं अशा बातम्या येतायत, ज्यामुळं शिक्षण आनंददायी नव्हे तर भीतीदायक ठरू लागलंय. अगदी ताज्या तीन घटनांचा विचार करून मुलं शाळेत जायला आणि पालक त्यांना शाळेत पाठवायला घाबरू लागलेत. कौशांबी जिल्ह्यातल्या मंझनपूर गावात चौथीत शिकणार्या विद्यार्थ्याला शिक्षकांनी दांडकं ङ्गेकून मारलं. मुलाच्या डाव्या डोळ्याला ते लागलं आणि डोळा कायमचा निकामी झाला. अलिगढमध्ये दप्तर घरी विसरल्याबद्दल मुलाचे कपडे काढून त्याला बेदम मारहाण करण्यात आली आणि 'इलेक्ट्रिक चेअर'वर बसवून शॉक देण्याची धमकीही देण्यात आली. हाथरसच्या रसगव्हाण गावात घडलेल्या घटनेमुळं तर संपूर्ण देश हादरलाय, कारण या घटनेत चक्क शाळेची भरभराट व्हावी, म्हणून विद्यार्थ्याचा बळी दिल्याचं समोर येतंय.

सामान्य घरातला दुसरीत शिकणारा मुलगा. आईवडील म्हणायचे, याला कलेक्टर करायचं. मुलगा हुशार. घरापासून दूर शाळेच्या होस्टेलमध्ये राहणारा. शाळाचालकाचा वडिलांना अचानक ङ्गोन येतो. मुलाला ताप आल्याचं कळतं. वडील नेहमीप्रमाणं नोएडामध्ये कारखान्यात कामाला जाण्याच्या तयारीत. पण मुलाला आराम करण्यासाठी घरी आणावं, असा विचार करून कामावर जाण्याऐवजी शाळेत जातात. शाळाचालकाला ङ्गोन करतात, तेव्हा तो शाळेपासून २० किलोमीटर अंतरावर असल्याचं समजतं. तिथे जाऊनसुद्धा वडिलांची ना मुलाची भेट होते, ना शाळाचालक भेटतो.

त्यानंतर शाळाचालक मुलाच्या वडिलांचे ङ्गोनच घेणं बंद करतो आणि त्यामुळं वडिलांना शंका येऊन प्रकरण पोलिसात जातं. तपास सुरू केल्यावर शाळेपासून २५ किलोमीटरवर शाळाचालकाची कार सापडते. मागच्या सीटवर मुलाचा मृतदेह. गळ्यावर काळ्या-निळ्या खुणा. मुलाचा खून झाल्याचं निष्पन्न झाल्यावर कारणांचा शोध सुरू होतो आणि भयानक सत्य समोर येतं. उच्चशिक्षित शाळाचालकाचा बाप मात्र जादूटोणावाला. शाळेपासून काही अंतरावर असलेल्या दोन खोल्यांमध्ये भुतं उतरवण्याचं, काळी जादू वगैरे करण्याचं काम करणारा. स्थानिक लोक त्याला 'भगतजी' म्हणतात. त्याच्या चौकशीतून मुलाचा बळी दिल्याची घटना उघड झाली.

शाळेला परवानगी पाचवीपर्यंत. तरी आठवीपर्यंतचे वर्ग दामटून चालवले जात होते. शाळेला होस्टेलची परवानगी नसतानाही ते चालवलं जात होतं. शिक्षणाधिकार कायद्यांतर्गत शाळेची चौकशी सुरू होती. शाळा उभारण्यासाठी चालकाने कर्ज काढलं होतं. अनेकांकडून हातउसनेही घेतले होते. पण शाळेला यश मिळत नव्हतं. भरभराट होत नव्हती. यासाठी पूर्वीही एका मुलाचा बळी देण्याचा प्रयत्न झाला होता, असं सांगतात. अंधश्रद्धा निर्मूलनाची सुरुवात जिथून व्हायला हवी, त्या शाळेची भरभराटनरबळीने होणार असेल, तर मामला अवघड आहे.

# १ ऑक्टोबर १९४१पहील्या महार रेजीमेंट ची स्थापना दिवस. १ ऑक्टोबर १९४१रोजी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अथक प्रयत्नांमुळे बेळगाव येथे पहिल्या महार रेजीमेंट ची स्थापना झाली










महार सैनिक हे पराक्रमी होते त्यांचा स्वामी निष्ठेची दखल ब्रिटिशांनी घेतली होती डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी १९३९साली महार रेजीमेंटसाठी प्रयत्न केले त्यांचा प्रयत्नांमुळे बेळगाव येथे १९४१साली पहिल्या महार रेजीमेंट ची स्थापना झाली आज महार रेजीमेंट चा एकूण २२बटालियन आहेत १९४७साली काश्मीर फ्रंन्ट १९६२चीन-भारत युद्ध १९६५नि,१९७१भारत-पाक युद्ध या मध्ये महार रेजीमेंट ने भाग घेतला महार रेजीमेंट चा वीर सैनिकांना एक परमवीर चक्र चार महावीर चक्र २९वीर चक्र २ कीर्ति चक्र एक अशोक चक्र ५परमविशिष्ट पदक असे अनेक सन्मान महार रेजीमेंट चा निरनिराळया बटालियनातील सैनिकांना मिळालेले आहेत महार सैनिकांचा लढावू इतिहास तसा फार जूना आहे छत्रपति शिवाजी महाराज यांचा सैन्यात महार ही लढाऊ जात अग्रेसर होती छत्रपति शिवाजी महाराजांचा स्वराज्यात १३महार किल्ल्याचे प्रमुख किल्लेदार होते आज ढाले नाव लावणारयांचे पूर्वज सैन्यात ढालीसारखे पुढे असत म्हणून त्यांना ढाले असे नाव पडले छत्रपति शिवाजी महाराजांचा अंगरक्षक हा महार होता, ● होता जिवा म्हणून वाचला शिवा ●हा वाक्प्रचार सुपरिचित आहे पहिल्या बाजीराव पेशव्यांचे महार सैनिकांचे एक दलच होते आणि हे दल आघाडीवर जाऊन लढणारया सैनिक पथकातील असायचे या कारणांमुळे पहिल्या बाजीराव हा त्यांना विशेष मानाने वागवीत असे




महारसैनिक हे हिम्मतवाले पराक्रमी आणि शत्रुवर एल्गार करणारे होते ●महार जातीविषयी सैनिक म्हणून जे गुण वर सांगितले आहेत ते अगदी योग्य आहेत पण महार जातीत असलेली स्वामीनिष्ठा इमानदारी कळकळ या गुणांची दखल तेव्हाचा ब्रिटिश सरकार ने घेतली होती त्यामुळे त्यांना नाशिक व अलिपुर येथील गवर्नमेंट सिक्योरिटी प्रेस येथील गार्ड रेल्वे मध्ये गेटमन चाबीवाला खलाशी,पॉईटमन, पोस्ट खात्यातील रनर, म्हणजे पोस्टाचे पत्र मनी ऑर्डर चे पैसे घेऊन जाणारा,शेतसारा वसूल करणारा कोतवाल अशा प्रकारचा नोकरयामध्ये महार जातीला समाविष्ट केले जात असे,●१जानेवारी १८१८मध्ये,इंग्रज -मराठयांचा युद्धामध्ये पेशव्यांचा पराभव झाला हे युद्ध कोरेगांव जि, पुणे झाले ब्रिटिशांचा सैन्यात महार सैनिक होते (२/१बॉम्बे नेटिव्ह लाईट इन्फैंट्री हया लढाई मध्ये पेशवा साम्राज्याचा अंत झाला या लढाई मध्ये जे २२महार सैनिक धारा तीर्थ पडले त्यांची नावे



विजय स्तंभावर (कोरेगांव)कोरली आहेत ब्रिटिशांनी महू येथे महार बटालियन ची स्थापना केली तेथे सुबेदार मेजर रामजी सपकाळ शिक्षक म्हणून होते हे डॉ बाबासाहेब आंबेडकराचे वडील होते महुलाच डॉ बाबासाहेब आंबेडकराचा जन्म झाला १८९२मध्ये ही बटालियन विसर्जन करण्यात आली आणि नंतर सुबेदार मेजर रामजी सपकाळ महाराष्ट्रात दापोली (रत्नागिरी) परतले डॉ बाबासाहेब आंबेडकरानी महार बटालियन पुनस्थापना व्हावी म्हणून १९३९साली तत्कालीन मुंबई इलाख्याचे गवर्नर यांची भेट घेतली हिंदुस्तान चा कमांडर -इन चीफ फिलिप्स चेटवूड यानी महार रेजीमेंट निर्माण करण्याची गळ घातली डॉ बाबासाहेब आंबेडकर हे महार जातीला सैनिकी पेशामध्ये प्रवेश मिळावा म्हणून प्रयत्नशील होते पण त्यांना यश मिळाले ते व्हाईसरॉय लिनलिथगो चा संरक्षण सल्लागार समितीचे सदस्य असताना पहिल्या महार रेजीमेंट ची स्थापना १ ऑक्टोबर १९४१ला,बेळगाव येथे झाली नंतर १९४२साली, कामठी येथे आणि १९४३साली, नौशेरा येथे (पंजाब आता पाकिस्तानात)झाली डॉ बाबासाहेबानी महार बटालियन पूर्ण जीवन केले असे म्हणने उचित ठरेल कारण महार बटालियन सुरू व्हावी म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकराचे वडील सुबेदार मेजर रामजी मालोजी सपकाळ हे प्रयत्नशील होते त्यांचा कार्याला सक्रिय सहायता करणारे न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे हे होते त्यांचा प्रयत्नाला यश येऊन पहिल्या महायुद्धाचा काळात जून १९१७ला,१११महार बटालियन पंजाब रेजिमेंट चा ७१बटालियन मध्ये सामील करण्यात आली नंतर जागतिक मंदी १९२९-३०मध्ये, आल्यानंतर ही बटालियन विसर्जन करण्यात आली ●●●●यश शिद्धी माजी सैनिक सेवा संघ धुळे व नंदुरबार गूप चे माजी सैनिक शेनपडू पवार १महार रेजीमेंट =ज=जभिम अनूयायाना १ ऑक्टोबर महार रेजीमेंट स्थापना दिना, निमित्त कोटी कोटी सुभेच्छा =जजय भिम =जजय महार●●●●●●● प्रवीण सोनवणे माजी सैनिक महार रेजीमेंट, लातूर

# महाराष्ट्रातील माहिती अधिकाराची सद्य:स्थिती

महाराष्ट्र हे भारतातील एक प्रगत आणि पुरोगामी राज्य समजले जाते. इतिहासामध्ये महाराष्ट्रातल्या पुरोगामी परंपरेचे दाखले जागोजागी आढळतात. माहितीच्या अधिकाराचा केंद्रीय कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीच महाराष्ट्राने राज्य पातळीवर माहितीच्या अधिकाराचा कायदा तयार केला होता आणि या कायद्याच्या महाराष्ट्रातील नागरिकांनी चांगला उपयोग देखील सुरू केला होता. हा कायदा सप्टेंबर २००३ पासून राज्यात लागू झाला होता आणि तेव्हापासून केंद्रीय कायदा येईपर्यंत म्हणजे सुमारे दोन वर्षात तब्बल ३३ हजार अर्ज माहिती अधिकाराअंतर्गत करण्यात आले. त्यापैकी सुमारे ८०० अर्जदारांनी अपील केले म्हणजे ३२,२०० अर्जदारांना माहितीचा पुरवठा झाला. एवढ्या मोठ्या प्रमाणात राज्यामध्ये माहितीच्या अधिकाराचे अर्ज प्राप्त झाले. या आकडेवारीवरून असे दिसून येते की इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील नागरिक हे राज्य पातळीवरच्या माहिती अधिकार कायद्याचा वापर अधिक करू इच्छितात.

'माहितीचा अधिकार अधिनियम, २००५' या केंद्रीय कायद्याच्या कलम ६(१) अंतर्गत माहिती मिळवण्यासाठी राज्यातील सार्वजनिक प्राधिकरणाकडे एकूण ७,१३,५८३ एवढे माहिती अर्ज प्राप्त झाले व त्यापैकी ६,८०,७२० अर्जावर प्रत्यक्ष माहिती देण्यात आली, अशी आकडेवारी उपलब्ध आहे. यापैकी एकूण ४५,१८९ इतकी द्वितीय अपिले आयोगास प्राप्त झाली. यावरून एकूण प्राप्त झालेल्या ७,१३,५८३ अर्जांपैकी सुमारे ४.६० टक्के अर्जांवर द्वितीय अपिले प्राप्त झाली आहेत. म्हणजेच सुमारे ९५.३ टक्के अर्जदारांना त्यांना हवी असलेली माहिती मिळाल्याचे स्पष्ट होते.

सन २०२० मध्ये निकाली काढलेल्या द्वितीय अपील अर्जांची संख्या २३,६१८ होती. तर सन २०२१ मध्ये २१,०१५ इतकी द्वितीय अपिले निकाली काढण्यात आली आहेत. राज्य माहिती आयोगातर्फे अपिले व तक्रारीचा निपटारा करण्याचे काम जोमाने करण्यात येत असले, तरी कामे प्रलंबित असण्याचे कारण म्हणजे या आयोगातील रिक्त पदे. आज माहिती आयोगातील सुमारे ४१ टक्के पदे अद्यापही भरली गेलेली नाहीत, याचा विपरीत परिणाम कामावर होत असल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू झाल्यापासून ते २०२१ या वर्षापर्यंतचा विचार केला तर सर्वात कमी अर्ज २००६ मध्ये प्राप्त झाले, तर सर्वाधिक अर्ज २०१८ या वर्षात प्राप्त झाल्याचे दिसून येते. तर त्या खालोखाल वर्ष २०१५ मध्ये प्राप्त झाल्याची दिसून येते. माहिती अधिकार अधिनियम, २००५ लागू झाल्यापासून ते २०१३ पर्यंत दरवर्षी सातत्याने माहिती अर्जाची संख्या वाढत गेल्याचे दिसून येते, तर वर्ष २०१२ च्या तुलनेत वर्ष २०१३ मध्ये १०.०९ टक्के वाढ झाली तर वर्ष २०१४ मध्ये वर्ष २०१३ च्या तुलनेत ६.४१ टक्के घट झाल्याचे दिसून येते. वर्ष २०१८ मध्ये सर्वाधिक ९,२५,४८० माहिती अधिकाराचे अर्ज प्राप्त झाले, तर वर्ष २०१७ मध्ये ७,५७,०६० अर्ज प्राप्त झाले होते. म्हणजेच इ. स. २०१७ च्या तुलनेत २०१८ मध्ये २०.५५ टक्के वाढ झाल्याचे दिसते, म्हणजेच आजपर्यंतची सर्वाधिक वाढ झाली होती. त्यानंतर प्रत्येक वर्षी अर्जांची संख्या कमी -कमी होत गेली आहे, त्याचे एक कारण म्हणजे कोविड-१९ महामारीच्या साथीमुळे ही संख्या कमी झाली असल्याचे दिसून येते. सन २०२० मध्ये अलीकडील काळातील सर्वात कमी माहिती अर्ज आल्याचे दिसून येते.

या माहितीवरून असे सिद्ध होते की, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू झाल्यापासून (दरवर्षी) दिवसेंदिवस माहिती मागविणाऱ्याची संख्या ही वाढतच असल्याचे दिसून येते. मात्र सन २०२० मध्ये कोविड-१९ च्या महामारीमुळे ही संख्या कमी झाल्याचे दिसते, तर सन २०२१ नंतर प्रत्येक वर्षी पुन्हा माहिती अर्जाच्या संखेमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येते. म्हणजेच याचा अर्थ या कायद्यामुळे नागरिक सजग होऊन जनसामान्यांमध्ये या कायद्याचा प्रचार व प्रसार होत असल्याचे सिद्ध होते. असे असले तरी राज्य माहिती आयोगाकडे प्रकरणे (अपील) प्रलंबित आहेत. शासकीय यंत्रणा माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती नाकारू लागली तर ती माहिती देण्यास शासकीय यंत्रणेला भाग पाडण्याचे काम राज्य माहिती आयोग करीत असतात, परंतु येथेही दिरंगाईचे चित्र दिसून येते. या दिरंगाईमुळे शासन व प्रशासनात भ्रष्टाचारास वाव मिळू शकते. यासाठी राज्य माहिती आयोगातील रिक्त असलेली पदे पूर्णपणे भरून प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे व वेळेच्या वेळेत प्रकरणी निकाली काढले तर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर या कायद्याचा सकारात्मक परिणाम दिसून येईल. यातून प्रशासकीय पारदर्शकता, तत्परता आणि गतिशीलता येऊन प्रशासन हे जनताभिमुख होण्यास वेळ लागणार नाही.




माहिती अधिकार कायद्यामुळे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाची माहिती मिळत आहे. या कायद्यानुसार ही माहिती संबंधित खाते वा प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरूनही मिळवता येऊ लागली आहे. आज जगभरात सुशासन संकल्पनेचा आधार म्हणून ई-गव्हर्नन्सचा उपयोग होत आहे. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून एक नवीन व सफलता पूर्वक कार्य करणारी प्रशासकीय व्यवस्था निर्माण करण्यावर भर दिला जात आहे.

महाराष्ट्रातील माहिती अधिकाराची अंमलबजावणीमुळे आपिले, तक्रारी याचा निपटारा करण्यासाठी राज्य माहिती आयोग महत्त्वाची भूमिका बजावतो हे खरेच, परंतु या आयोगामधील मुख्य माहिती आयुक्त, माहिती आयुक्त अशी मुख्य पदेदेखील आजघडीला रिक्त आहेत. या आयोगातील एकंदर ४१ टक्के पदे अद्यापही रिक्त असल्यामुळे अर्जाचे व तक्रारीचे निवारण वेळेवर होत नाहीत असे दिसून येते. यामुळे राज्य माहिती आयोगातील अधिकारी व कर्मचारी यांची पदे पूर्णतः भरणे आवश्यक आहे. तरच आयोगाकडे प्रलंबित असलेल्या कार्याचा निपटारा वेळेत करणे शक्य होईल.

महिती अधिकार कायद्याच्या सक्षमीकरणासाठी :

(१) प्रत्येक लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आल्यानंतर सर्वप्रथम त्यांना माहितीच्या अधिकाराचे शिक्षण व प्रशिक्षण देऊन त्यांना गोपनीयते ऐवजी पारदर्शकतेची शपथ द्यावी.

(२) विविध राजकीय पक्ष हे या कायद्याअंतर्गतच असले पाहिजेत.

(३) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर माहिती अधिकार अधिनियम कलम ४ मधील सांगितलेली माहिती ही संकेतस्थळावर अद्यावत ठेवावी.

(४) द्वितीय अपीलावरील सुनावणी ही वेळेत व आपत्कालीन परिस्थितीत ऑनलाईन घेण्यात यावी.

(५) महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या माहितीच्या ऑनलाईन अर्ज प्रणाली मध्ये महाराष्ट्रातील सर्वच सार्वजनिक प्राधिकरणाचा उल्लेख असावा.

(६) राज्य माहिती आयोगातील रिक्त पदे पूर्णत: भरण्यात यावी.

(७) सामाजिक हिताची व संवेदनशील माहिती मागविणाऱ्या नागरिकास पोलीस प्रशासनाकडून संरक्षण देण्यात यावे.

(८ ) माहिती अधिकाराचा अर्ज करीत असताना त्यावर नागरिकांना आधार क्रमांकाची नोंद करणे बंधनकारक करावे त्यामुळे माहितीचा गैरवापर करणाऱ्या व्यक्तीची माहिती मिळू शकते.

(९) शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांबरोबरच सर्वसामान्य नागरिकांना देखील प्रशिक्षण शासकीय संस्था व विविध स्वयंसेवी संस्थाद्वारे देण्यात यावे.

लेखक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेत सहाय्यक प्राध्यापक आहेत.

# रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन तर्फे वॉकथॉन संपन्न




लातूर/प्रतिनिधी :– रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन आणि शिवपुजे हार्ट केअर यांच्यावतीने जागतिक हृदयदिना निमित्त जनजागृतीसाठी वॉकथॉन संपन्न झाले.

यासाठी प्रमुख पाहुणे अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे उपस्थित होते.यावेळी झुंबा व वॉर्मअप घेण्यात आला.डॉ.देवरे यांच्या हस्ते झेंडा दाखवून वॉकथॉनची सुरवात करण्यात आले.क्रीडा संकुल येथून राजीव गांधी चौक मार्गे परत क्रीडा संकुल पर्यंत वॉक करण्यात आले.

यावेळी हृदयरोग तज्ञ डॉ.संजय शिवपूजे आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांनी उपस्थितांना हृदयविकार आणि त्यासाठी घ्यावयाची काळजी याबद्दल मार्गदर्शन केले.याप्रसंगी आयएमएच्या वतीने डॉ.चेतन सारडा उपस्थित होते. अत्यावश्यक असताना सीपीआर कसा द्यावा ? याचे प्रात्यक्षिक यावेळी घेण्यात आले.

या वॉकथॉनमध्ये रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन,इंडियन मेडिकल असोसिएशन, इनरव्हील क्लब,ग्रीन वृक्ष लातूर,दयानंद महाविद्यालय,शाहू महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सचिन मालू यांनी केले.प्रोजेक्ट चेअरमन किशोर दाताळ, अध्यक्ष चेतन पंढरीकर, सचिव गिरीश पेन्सलवार, अमोल दाडगे,मोतीलाल वर्मा,कलश मुंदडा,श्रवण बियाणी,अमोल बनाळे, शीतल देवणीकर,छाया मोरलावार,अर्चना मालू, डॉ.स्नेहल शिवपुजे, सारिका गांधी,अनुराधा अग्रवाल व सदस्यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले. हृदयरोगतज्ञ डॉ.संजय शिवपूजे यांनी उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांची उत्तरेही दिली.यावेळी रोटरियन्स, रोट्रॅक्ट्रर्स, इनरव्हील सदस्य, इन्ट्रॅक्टर्स, डॉक्टर्स, व्यापारी,विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.किशोर दाताळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# आदिवासी समाजाचा विविध मागण्यासाठी राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन



किनवट/शेख शौकत :–किनवट तालुका चिखली फाटा येथील आदिवासी समाजाच्या आरक्षणाबाबत वेळोवेळी होत असलेल्या अन्यावाच्या विरोधात व आदिवासी समाजांच्या मूलभूत गरजा अशा विविध मागण्या घेऊन आदिवासी समाजाने आज दिनांक ३० सप्टेंबर रोजी रस्त्यावर उतरून किनवट नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील चिखली फाटा येथे रास्ता रोको आंदोलन केले. राज्याचे मुख्यमंत्री यांनी धनगर समाजाला आदिवासी जमातीत आरक्षण देण्याचा जीआर काढू असे आश्वासित केल्याने राज्यातील आदिवासी समाज आक्रमक झाला असून आदिवासी समाजाची आक्रमकता सर्व राज्यभरात पाहायला मिळत आहे. किनवट तालुक्यातील आदिवासी समाजातील सुशिक्षित बेरोजगार तरुण व आदिवासी समाजातील नेत्यांनी व आदिवासी नागरिकांनी आज एकत्र येत किनवट नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील चिखली फाटा येथे रास्ता रोको आंदोलन केले. हा रास्ता रोको आंदोलन तब्बल एक ते दीड तास सुरू असल्याने नांदेड ते किनवट लागल्या होत्या आणि काही काळासाठी राष्ट्रीय महामार्गावर व तेलंगणात जाणाऱ्या वाहतूक विस्कळीत झाली होती. हा निर्मल मार्गावर वाहनाच्या रांगाच रांगा रास्ता रोको सुरू असताना या रास्ता रोको आंदोलनामध्ये कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी किनवट पोलिसांनी चांगलाच बंदोबस्त ठेवला होता. या रास्ता रोको आंदोलनादरम्यान आदिवासी नेत्यांनी आपापली मते मांडली त्याचबरोबर अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेच्या वतीने धनगर समाजाला आदिवासी जमातीत समाविष्ट करू नये व पेसा कायदा अंतर्गत रिक्त असलेल्या जागा त्वरित भराव्यात अशा मागणीचे निवेदन महसूल विभागाचे मंडळ अधिकारी जाधव यांना देऊन आंदोलन मागे घेतले. याप्रसंगी प्रा. विजय खुपसे, गोपीनाथ बुलबुले, सेवानिवृत्त जिल्हा आरोग्य अधिकारी दत्ता धनवे. डॉक्टर सुभाष बानोळे, बालाजी भिसे, गणेश बागतकर, वसंत कुडमुते, शैलेश मेश्राम, रामा आहे, शेषेराव ढोले, तुकाराम तांबारे, शिवाजी भुरके, तुकाराम कोकाटे, माधव बाळके, सुरेश देशमुखे यांच्यासह अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे पदाधिकारी व सुशिक्षित बेरोजगार तरुण मोठ्या संख्येने या रास्ता रोको आंदोलनामध्ये सहभागी झाला होता.

# मटका चालवणार्या ७ जणांवर लातूर जिल्ह्यातून तडीपार ची कारवाई

## पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे कौतुक

लातूर :– मटका चालवणार्या ७ जणांवर लातूर जिल्ह्यातून तडीपार ची कारवाई* याबाबत याबाबत थोडक्यात माहिती अशी की, लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे आदेशान्वये,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांचे मार्गदर्शनात वेळोवेळी मोहीम राबवून अवैध धंदे करणाऱ्या विरुद्ध गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्यात येत आहे.

लातूर शहरातील व जिल्ह्यातील मटका जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या लोकाविरुद्ध मोठ्या प्रमाणात गुन्हे दाखल करून मटका जुगार चालवणाऱ्या वर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. परंतु काही मटका जुगार चालविणारे लोकांवर वेळोवेळी गुन्हे दाखल करून व प्रतिबंधात्मक कार्यवाही करूनही त्यांच्यात काहीच सुधारणा होत नाही. ते लपून–छपून मटका जुगार चालवीत असताना परत मिळून आल्याने व त्यांच्या अशा कृत्यामुळे समाजातील गोरगरीब, मजदूर वर्ग झटपट पैसे कमविण्याच्या आमिषाला बळी पडून जुगारांमध्ये पैसे हारल्याने त्यांच्या कौटुंबिक जीवनावर विपरीत परिणाम होऊन अनेक जनामध्ये नैराश्य निर्माण होऊन ते व्यसनाधीन होण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे.

काही मटका जुगार चालविणारे लोक त्यांच्यावर वारंवार गुन्हे दाखल होऊनही व प्रतिबंधात्मक कार्यवाही करूनही परत लपून–छपून मटका जुगार चालवीत आहेत त्यांच्या वर्तनामध्ये काहीच फरक पडत नाही याची गंभीर दखल घेऊन पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी दिनांक २५/०९/२०२४ रोजी लातूर शहरातील ७ इसमांनावर लातूर जिल्ह्यातून तीन महिन्याकरिता तडीपार (हद्दपार) ची कार्यवाही केली असून यामध्ये

संजय भानुदास गायकवाड, राहणार बौद्ध नगर, लातूर,
नागनाथ हरिभाऊ मुंडे, राहणार मजगे नगर, लातूर,
सागर किशोर सरवदे , राहणार हडको कॉलनी, एमआयडीसी लातूर,
बंडू वसंत मादळे, राहणार बौद्ध नगर, सिद्धार्थ सोसायटी लातूर,
खालील शब्बीर शेख, राहणार अंजली नगर, लातूर,
लक्ष्मण आप्पाराव वाघमारे, राहणार बौद्ध नगर, लातूर,
संजय श्रीमंत यादव, राहणार मोती नगर, लातूर,
यांचेवर तडीपार (हद्दपार) ची कार्यवाही करण्यात करण्यात आली असून नमूद इसमाना लातूर जिल्ह्याच्या बाहेर नेऊन सोडण्यात आले आहे.

तर मटका जुगार खेळविणाऱ्या इतर २० लोकाविरुद्ध दाखल गुन्ह्याची परिस्थिती पाहता त्यांना सुधारण्यासाठी एक संधी म्हणून मानवीय दृष्टिकोनातून विचार करून त्यांना हद्दपार न करता त्यांच्याकडून सहा महिन्यासाठी प्रतिष्ठित जामीनदारासह चांगल्या वर्तुणुकीचे हमीपत्र घेण्यात आले आहे.

नमूद लोकाविरुद्ध उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) भागवत फुंदे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, पोलिस अमलदार प्रदीप स्वामी, गांधी चौक पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सुधाकर देडे यांनी सविस्तर हद्दपार प्रस्ताव तयार करून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्याकडे पाठविले होते. त्यावर सदर प्रस्तावांचे अवलोक करून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी नमुद लोकाविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५ प्रमाणे कार्यवाही करून ७ लोकांना लातूर जिल्ह्यातून तीन महिन्यासाठी तडीपार (हद्दपार) केले आहे.

सदर कारवाईच्या माध्यमातून अवैध धंदे चालविणारे लोकांना लातूर जिल्ह्यातून तडीपार (हद्दपार) केल्यामुळे अवैध धंद्यांना प्रतिबंध बसणार असून अवैध धंदे करणाऱ्यांना चांगलाच दणका बसला असून अवैध धंदे करणाऱ्यांना जरब बसणार आहे.

# महात्मा फुले मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाचे कर्ज प्रकरणे निकाली काढा भीम सैनिकांचे गांधी चौकात थाळी नाद आंदोलन



लातूर :– महात्मा फुले मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ एनएसएफडीसी योजनेअंतर्गत व्यवसायिकांनी गेल्या एक वर्षापासून कर्जासाठी फाईल दाखल केल्या परंतु महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यांना मंजूर हमीपत्र अद्याप देण्यात आले नाही.तात्काळ मंजूर हमीपत्र देऊन कर्ज प्रकरणे निकाली काढण्यात यावे यासाठी लातूर जिल्ह्यातील भीमसैनिकांच्या वतीने महात्मा गांधी चौक येथे थाळी नाद आंदोलन करण्यात आले. यावेळी लाला सुरवसे,माजी नगरसेवक नवनाथ आल्टे,माजी नगरसेवक राहुल कांबळे,डी.उमाकांत,समाधान शितोळे,विष्णू तांदळे,निलेश मांदळे,विनोद माने,विनय जाकते,रवी गायकवाड, श्रृंगारे अमोल,कैलास कांबळे,सुरज सुरवसे,दिपक सिरसाठ,महेश जाधव, पांडुरंग आदमाने,मुरली गायकवाड,विलास चक्रे,परमेश्वर चव्हाण, राहुल सरवदे, प्रफुल्ल किर्ते, सचिन कांबळे, महेंद्र कांबळे,साहेबराव गायकवाड,लखन धावारे आदींची उपस्थिती होती.

# आता औषध न घेता ‘ॲसिडिटी’ दूर होणार ! फक्त ‘हा’ घरगुती उपाय एकदा करून पाहा, मिळेल झटपट आराम



आपल्या बदलत्या जीवनशैलीमुळे काही आजारांनी माणसाच्या शरीरात कायमस्वरुपी घर केलं आहे. ‘ॲसिडिटी’ हे त्यापैकीच एक आहे. या आजाराने सध्या अनेक लोकांना ग्रासलं असून, दैनंदिन जीवन अगदी हैराण करून ठेवलं आहे.

जेवणाच्या अनियमित वेळा, बदललेला आहार, व्यायामाचा अभाव, मानसिक ताण व अपुरी झोप ही यासाठीची प्रमुख कारणं आहेत. वास्तविक हे आजार गंभीर स्वरुप धारण करण्याआधी घरच्याघरी त्यावर उपचार करणं कधीही चांगलं.पोटात जळजळ किंवा ॲसिडिटी एक कॉमन समस्या आहे. तिखट, मसालेदार, तळलेले पदार्थ खाल्ल्याने, तणाव किंवा चुकीच्या लाइफस्टाईलमुळे ही समस्या होते. ही समस्या दूर करण्याचे अनेक उपाय आहेत. पण आज आम्ही तुम्हाला एक सोपा उपाय सांगणार आहोत.

नुकत्याच करण्यात आलेल्या एका रिसर्चमध्ये आढळलं की, नियमितपणे चालल्याने ॲसिडिटीचे लक्षण कमी करण्यास आणि भविष्यात त्याचा धोका कमी करण्यास मदत होते. या रिसर्चमध्ये लोकांना आढळलं की, जे लोक १२ आठवडे रोज ३० मिनिटे पायी चालले त्यांची ॲसिडिटीची लक्षणे खूप कमी झाली.

कसा मिळतो फायदा ?

पायी चालल्याने पोटाच्या मांसपेशींना उत्तेजना मिळते, ज्यामुळे पचनक्रिया वेगवान होते. अन्न सहजपणे पचतं आणि पोटात ॲसिडची निर्मिती कमी होते. त्याशिवाय पायी चालल्याने तणाव कमी होतो, जो ॲसिडिटीची समस्या वाढण्याचं एक मुख्य कारण आहे.

पायी चालण्याचे फायदे ?

पचनक्रिया सुधारते:

पायी चालल्याने शरीराची हालचाला होते, ज्यामुळे पचनक्रियेला गती मिळते. अन्न चांगलं पचतं आणि पोटात ॲसिड कमी तयार होतं.

पोटाच्या मांसपेशी मजबूत होतात:

पायी चालल्याने पोटाच्या मांसपेशी मजबूत होतात, ज्यामुळे अन्न खाली सरकवण्याची क्षमता वाढते. तसेच ॲसिड पुन्हा परत येण्याचा धोकाही कमी राहतो.

तणाव कमी होतो:

तणावामुळे ॲसिडिटी वाढते. पायी चालल्याने तणाव कमी करण्यास मदत मिळते आणि मन शांत हतं. ज्यामुळे आपोआप ॲसिडिटीची समस्या कमी होते.

वजन कमी करण्यास मदत:

ॲसिडिटीची समस्या अनेकदा लठ्ठपणाशी जुळलेली असते. पायी चालल्याने वजन कमी करण्यास मदत मिळते. ज्यामुळे ॲसिडिटीची समस्या कमी होण्यास मदत मिळते.

# महाराष्ट्र राज्य पत्रकारसंघ मुंबई मराठवाडा अध्यक्ष श्री.वैभव स्वामी यांची नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या निवास स्थानीसदिच्छाभेट,विविध विषयावर झाली सांगोपांग चर्चा.



केज/प्रतिनिधी महाराष्ट्रराज्य पत्रकार संघ मुंबईचे मराठवाडा अध्यक्ष श्री.वैभव स्वामी यांची नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांच्या निवास स्थानी सदिच्छा भेट दिली आहे.दै.समर्थ राजयोगचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई, मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी व केजनगरपंचायत च्या नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांनी विविध विषयावर मन मोकळेपणाने सांगोपांग चर्चा केली.यावेळी नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी संपादक तथा मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी यांचा शाल व रोपटे देऊन सन्मान केला. यावेळी नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड, संपादक वैभव स्वामी, स्वाभिमानी पत्रकारसंघाचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील, सचिव तात्या गवळी, कोषाध्यक्ष विवेक बनसोड इत्यादी मान्यवर उपस्थित होते.दि.५ सप्टेंबर २०२४ रोजी वैभव स्वामी यांनी दैनिक समर्थ राजयोग व सा.शिववाणीच्या पाचव्या वर्धापनदिनाच्या निमीत्ताने हारतुरे न स्विकारता बीड जिल्ह्यातील ५५उर्दु विषय शिकविणार्या शिक्षक बंधु भगीनींचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानीत केले होते.या सत्कार सोहळ्याला केज नगर पंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड यांनी कार्यक्रमाला उपस्थीत राहुन शुभेच्छा देत निवासस्थानी भेट देण्यासाठी आमंत्रीत केले होते.अंबाजोगाई येथील पत्रकार श्री.सतीश मोरे यांच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाला उपस्थीत राहुन बीडला परतत असताना सौ.सिताताई बनसोड यांच्या निवास स्थानी सदिच्छा भेट दिली.

# शोतोकॉनमार्फत कलर बेल्ट परीक्षा

सोलापूर : शोतोकॉन मार्शल आर्ट कराटेकिंक बॉंक्सिग अकॅडमी व कराटे फेड्रेशन ऑफ शोतोकॉन इंडीया या संस्थेमार्फत कलर बेल्ट परीक्षा कै.रखमाबाई हत्तूरे मंगलकार्यालय येथे घेण्यात आली. ही परीक्षा सोलापूर जिल्हा टेक्निकल डायरेक्टर सेन्साई राजेंद्र हक्के, ब्लॅक बेल्ट ४ दान याच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. कार्यक्रमाच्या प्रमाणपत्र वितरणसाठी प्रमुख पाहूणे म्हणून विरेश हत्तूरे, भाजपा सरचिटणीस ता. द. सोलापूर मल्लिनाथ चिवडशेट्टी, होटगी स्टेशनचे तंटामुक्त अध्यक्ष सुरेश डवले, वळसंगचे ग्रामपंचायत सदस्यअनिल बर्वे, सामाजिक कार्यकर्ते दिपक टोणपे, माऊली महाविद्यालय वडाळा कॉलेजचे प्राध्यापक दत्ता हरवाळकर सर , या मान्यवरानी विध्यार्थीना शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमासाठी बाळे शाखेचे प्रशिक्षक युराज सुंटनुर, भागेश धुमघोडा, चंद्रकांत तवटे, मयुर फुलारी, समर्थ सुतार, धनलक्ष्मी बिराजदार, तेजश्री फुलारी या ब्लॅक बेल्ट विध्यार्थीनी परीश्रम घेतले व या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक मोरे यांनी केले तर आभार दत्ता हरवाळकर यांनी केले.



# विद्यार्थ्यांची कर्तव्यावर निष्ठा हवी.–डॉ.हनुमंत सौदागर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिसेगाव येथे माहिती अधिकार दिन साजरा.



केज/प्रतिनिधी विद्यार्थ्यांनी कर्तव्याचे पालन करायला हवे. कर्तव्यावर निष्ठा असायला हवी तरच भावी पिढीत आदर्श नागरिक घडतील असे मत डॉ.हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले. ते केज तालुक्यातील पिसेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माहिती अधिकार दिना निमित्त प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षशालेय व्यवस्थापन समिती माजी अध्यक्ष तथा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ केज तालुका सर चिटणीस मुंजाबा करपे प्रमुख मार्गदर्शक डॉ. हनुमंत सौदागर, मुख्याध्यापक माधव गोरे आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना ते म्हणाले विद्यार्थ्यांनी छोट्या छोट्या कृतीतून कर्तव्याचे पालन केल्यास प्रश्न निर्माण होत नाहीत.माहिती अधिकार काळाची गरज आहे परंतू माहितीच्या अधिकाराचा गैरवापर होऊनये.स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे.सारे भारतीय माझे बांधव आहेत ही प्रतिज्ञा विद्यार्थ्यांनी कृतीत आणावी.सार्वजनिक मालमत्ता,पर्यावरणास बाधा पोहोचणार नाही याची काळजी आपण सर्वांनी घ्यायला हवी असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या कृतीयुक्त स्वागत गीताने करण्यात आली.प्रस्ताविक श्री.गोरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सह शिक्षिका मंगल चाटे, सुलोचना फड,सुनीता जाधव,मनीषा नांदे ,दिलीप मुंडे ,स्वाती शेप, सुचिता माने,शिवाजी टिके आदींनी परिश्रम घेतले कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने महाकवी वामनदादा कर्डक यांना डिलीट पदवी द्यावी - प्रा.डॉ.सागर जाधव

## जयंतीनिमित्त सुप्रसिद्ध गायक मनोजराजा गोसावी आणि गायिका धम्मदिक्षा वाहुळे यांच्या भीमगीतांनी विचारांचा जागर







अंबाजोगाई / प्रतिनिधी :- येथील लोकशाहीर वामनदादा कर्डक कला अकादमी, अंबाजोगाई यांच्या वतीने महाकवी वामनदादा कर्डक यांच्या १०२ व्या जयंतीनिमित्त वामनदादा यांच्या सहवासातील मान्यवरांना पुरस्कार देऊन त्यांचा यथोचित सत्कार आणि यवतमाळ येथील सुप्रसिद्ध कवी, गायक मनोजराजा गोसावी आणि धम्मदिक्षा वाहुळे यांचा भीम गीत गायन कार्यक्रम रविवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी आद्यकवी मुकूंदराज सांस्कृतिक सभागृह, नगरपरिषद कार्यालय परिसर, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आला होता. महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जयंतीनिमित्त दादांनीच गायिलेल्या बुद्ध-प्रबुद्ध गीतांच्या दैदीप्यमान कार्यक्रमाचे व वामनदादांच्या सहवासातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ललिताताई घोडके (वामनदादा कर्डक यांची लेक) या होत्या. तर यावेळी डॉ.प्रो.एम.डी.इंगोले (आंबेडकरवादी हिंदी लेखक व वामनदादा कर्डक यांच्या गीतांचे अभ्यासक), प्रा.दिपक जमदाडे (बुलढाणा) या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. या प्रसंगी मनोजराजा गोसावी (यवतमाळ) यांना सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मणराव घोडके यांच्या स्मृतिप्रित्यर्थ २०२४ सालचा लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार आणि प्रा.डॉ.सागर जाधव, यवतमाळ (संपादक व प्रकाशक, वामनदादा कर्डक समग्र वाङमय खंड १ ते १६) यांना आयु.देवदास भाऊ सोनवणे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ २०२४ सालचा लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच प्रा गौतम गायकवाड लिखित लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतातील महान स्त्री पुरूष व्यक्तिरेखा या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात 'वंदन माणसाला' या जगन बापू सरवदे यांनी सादर केलेल्या स्वागतगीताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा.गौतम गायकवाड यांनी बुद्ध-फुले-शाहू-आंबेडकर यांचे प्रवर्तनवादी विचार गीत, संगीत, गायनाच्या माध्यमातून ज्यांनी 'जिथे गांव, तिथे भीमाचे नांव पोहोंचवणारा, 'भीमसा कौन बडा है, बताओ इस धर्तीपर, कोई नहीं. एक नया आंबेडकर पैदा हो' यासाठी आयुष्यभर भीमाईचे गीत गात संपूर्ण जीवन जगलेले वामनदादा कर्डक यांचा दिर्घ सहवास अंबाजोगाईच्या भूमीला लाभला. अशा या महाकवीच्या जयंतीनिमित्त हा प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित केला असल्याचे सांगितले. यावेळी सत्काराला उत्तर देताना प्रा.डॉ.सागर जाधव (यवतमाळ) म्हणाले की, वामनदादांनी आयुष्यभर महामानव बाबासाहेबांच्या विचारांचा जागर, प्रचार व प्रसार केला. गावोगावी बुध्द आणि भीम गीतातून प्रबोधन केले. प्रवर्तनाची दृष्टी दिली. जोपर्यंत जगात बाबासाहेबांचे नांव राहिल तोपर्यंत वामनदादांना जग विसरणार नाही. दादा आपल्या गाण्यातून जीवंत आहेत. आंबेडकरी चळवळीला गीतातून दिशा देणाऱ्या महाकवी वामनदादा कर्डक यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने डिलीट ही मानद पदवी द्यावी अशी मागणी प्रा.डॉ.जाधव यांनी यावेळी केली. सत्काराला उत्तर देताना डॉ. प्रो.एम.डी.इंगोले म्हणाले की, दादांनी वंदनीय बाबासाहेबांना गीतांतून विविध नावांनी संबोधले आहे. मानवी मुल्यांचा विचार करणारी अनेक प्रतिके वापरली आहेत. दादांच्या कविता आणि गीतांतून क्रांतीची मशाल तेवत राहीली असल्याचे डॉ.प्रो.इंगोले यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना ललिताताई घोडके यांनी आपण दादांची लेक आहोत असे सांगून एका चालत्या बोलत्या विद्यापीठात आपली जडणघडण झाल्याचे नमूद करून ललिताताई यांनी दादांच्या अनेक आठवणी कथन केल्या. यावेळी बळीराम उपाडे, महादेव भालेराव कु.भुतकर, प्रा. रमेश सरवदे, कु.सरकटे स्वितम इंगळे, अमोल तरकसे डॉ एम एच कांबळे यांनी दादांची विविध गिते सादर केली. यानंतर मनोजराजा गोसावी (यवतमाळ) आणि धम्मदिक्षा वाहुळे यांनी 'मी बुध्द गयेचा वारा', 'रमा तू मला क्षमा कर', 'नीच नितीचा कापू गळा' वादळ वारा यांसारख्या एकापेक्षा एक सरस, जोश पूर्ण, प्रबोधनपर गीतं गावून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. याप्रसंगी दादांच्या सहवासातील स्थानिक कलावंत जगन सरवदे, डि.एन.आचार्य, बलभीम तरकसे, शाहीर गौतम सरवदे तसेच परीवर्तनवादी चळवळीतील लेखक प्रा.गौतम गायकवाड यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार राहुल सुरवसे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी अंबाजोगाई शहर व परिसरात ज्येष्ठ नागरिक, विविध क्षेत्रातील मान्यवर, युवक, महिला यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जयंती उत्सव समितीच्या वतीने प्रमुख गायक राहुल सुरवसे, भीमशाहीर गौतम सरवदे, गायक महादेव भालेराव, प्रा.गौतम गायकवाड, जगन सरवदे, , अकादमीचे अध्यक्ष शंकर लोंढे, महादेव माने, रमाकांत वाव्हळे, डि.एन.घोबाळे, गायक बळीराम उपाडे, आकाश वेडे यांनी पुढाकार घेतला होता.

# ३४ व्या राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेमध्ये पुणे जिल्ह्याला सर्वसाधारण ि वजेतेपद तर संभाजीनगरला उपविजेतेपद व रत्नागिरीने पटकवला तिसरा क्रमांक







लातूर / प्रतिनिधी :-- जिल्हा क्रीडा संकुल लातूर येथे आमदार अमित देशमुख यांच्या संयुक्त विद्यमाने ३४ व्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट महिला व पुरुष तायक्कांदो क्रीडा स्पर्धा आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पुणे जिल्ह्याला सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त झाले तर उपविजेतेपद संभाजीनगर व तृतीय क्रमांक रत्नागिरी यांना प्राप्त झाला आहे. स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांच्या हस्ते पार पडले तर प्रमुख पाहुणे म्हणून क्रीडा अधिकारी दत्ता गडपल्लेवार तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडियाचे सहसचिव तथा तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबई चे महासचिव मिलिंद पठारे राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर अविनाश बारगजे, कोषाध्यक्ष व्यंकटेश कर्रा, दोन वेळा महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त आंतरराष्ट्रीय पंच प्रवीण बोरसे, आंतरराष्ट्रीय पंच सुभाष पाटील, राज्य पदाधिकारी धुलीचंद मेश्राम, अजित घारगे, सतीश केमसकर, राजेश महाजन, विजय कांबळे यांची उपस्थिती होती.

अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झालेल्या या स्पर्धे त राज्यातील २८ जिल्ह्यातून ४०० हून अधिक खेळाडू सहभागी झाले होते. पुमसे क्रीडा प्रकारात सर्वसाधारण विजेतेपद मुंबई उपनगर तर उपविजेतेपद रायगड व तृतीय क्रमांक पालघर यांना प्राप्त झाले आहे तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबई यांच्या मान्यतेने लातूर जिल्हा तायक्कांदो संघटनेने ३४ वी राज्यस्तर वरिष्ठ महिला व पुरुष तायक्कांदो स्पर्धे चे आयोजन लातूरातील जिल्हा क्रीडा संकुलात दिनांक २८ ते ३० सप्टेंबर यादरम्यान केली होती. या स्पर्धेमध्ये विविध राष्ट्रीय स्तरावरील विजेते खेळाडू सहभागी झाले होते. जिल्हा क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉल येथे आयोजित केलेल्या या स्पर्धेत तीन दिवस मोठा उत्साह जोश आणि जल्लोष पाहायला मिळत होता. १६ वजनी गटातील महिला व पुरुष खेळाडूंचा दिनांक १७ ते २० ऑक्टोबर दरम्यान पांडेचेरी येथे होत असलेल्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याचा संघ निवडण्यात आलेला आहे. क्युरोगी व पुमसे या दोन क्रीडा प्रकारात खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेसाठी सहभागी होणार आहेत.

तायक्कांदो असोसिएशन ऑफ लातूर जिल्हा संघटनेने कमी कालावधीत या राज्यस्तर स्पर्धेचे आयोजन केले होते तर या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिल्हा संघटनेचे सचिव श्री नेताजी जाधव यांच्या मार्गदर्शनात एस व्ही कुलकर्णी, धनश्री मदने, श्रद्धा कुलकर्णी, जानवी मदने, आसावरी कुलकर्णी, अनुश्री कुलकर्णी, विवांशी अंदुरे, स्वराली देशपांडे, सृष्टी कांबळे, अशितोष कांबळे, श्रावणी खडबडे, गणेश खडबडे, अब्राहम सय्यद, श्रावणी मोरे, श्रद्धा मोरे, श्रीराम मोरे, मानवी भोपी, हर्षवर्धन काळे, प्रथमेश सूर्यवंशी, प्रगती सुर्यवंशी, यशश्री खुजे, नम्रता, विराज देशमुख, मानसी सूर्यवंशी पूजा जाधव, समर्थ जाधव, तपस्वी परिहार, वाल्मीक भिसे, बबन सुळे, आकाश मिरगे आदींनी परिश्रम घेतले.

# लातूर येथे रविवारी संत संमेलनाचे आयोजन तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज राहणार उपस्थित

लातूर/प्रतिनिधी :- रविवार दि.६ ऑक्टोबर रोजी लातूर येथे संत संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज हभप शिरीष महाराज मोरे यांची या संमेलनास विशेष उपस्थिती राहणार असून ते आशीर्वचन देणार आहेत.

मराठवाडा ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते.राष्ट्रबांधणी व समाजबांधणी करणाऱ्या संत-महंतांचे संमेलन लातूर जिल्ह्यात प्रथमच होत आहे. हभप शिरीष महाराज मोरे हे या संमेलनात आशीर्वचन देणार आहेत.रविवारी सकाळी ९:३० वाजता जुन्या एमआयडीसी परिसरात एकमत कार्यालयाच्या पाठीमागील 'उद्योग मित्र' इमारतीत हे संमेलन होणार आहे.

या संमेलनास लातूर जिल्ह्यातील संत-महंतांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे,असे आवाहन आयोजक लातूर जिल्हा संत संमेलन समितीच्या वतीने ड.गौरीशंकर कौळखेरे, सुनिल देशपांडे,सहजानंद हुरदळे व शाम बलुतकर यांनी केले आहे.

## पुरोगामी पत्रकार संघ सलग्न कला क्रीडा विश्व समितीच्या तालुका अध्यक्षपदी अनिल वैरागे यांची निवड,कलाकारांना न्याय हक्क मिळवून देण्या करिता सदैव सक्षम. -अनिल वैरागे



के ज/प्रतिनिधी पत्रकारांच्या न्याय, हक्कासाठी लढणाऱ्या पुरोगामी पत्रकार संघाशी सलग्न असलेल्या कला क्रीडाविश्व समितीची केज तालुका कार्यकारिणी निवडीची बैठक केज येथील विश्रामगृहावर राज्याचे प्रसिध्दी प्रमुख दत्तात्रय मुजमुले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.पुरोगामी पत्रकार संघ सलग्न कला क्रीडा विश्व समितीच्या केज तालुकाध्यक्षपदी अनिल वैरागे यांची तर तालुका उपाध्यक्ष पदी दिलीप खाडे,सचिन लांडगे सचिव,मुनीर भाई कुरेशी सहसचिव,बलभीम मस्के सल्लागार,शेख इकबाल सहसल्लागार,प्रदीपहजारेशहरअध्यक्ष अनुज रोकडे शहर सचिव,किशोर भांडे संघटक,शेख चुन्नुमिया सहसंघटक,दीपक खाडे सदस्य शिवमुर्ती हजारे सदस्य यांच्या निवडी करण्यात आल्या.तसेच महिला आघाडी तालुका अध्यक्षपदी पूजा घाडगे, सिंधुताई मुळे महिला संघटक,अनिता कसबे शहराध्यक्ष,छबू अंधारे शहर संघटकपदी निवड पत्र देऊन निवडीकरण्यात आल्या.यावेळी पुरोगामी पत्रकार संघाचे राज्य प्रसिध्दी प्रमुख तथा जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मुजमुले,तालुकाध्यक्ष रंजीत घाडगे,सचिव दिनकर जाधव,उपाध्यक्ष मनोराम पवार यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# जेष्ठ नागरिक दिनानिमित्त आयोजित आरोग्य शिबीर, आधारवड कृतज्ञता सोहळ्याला प्रतिसाद





लातूर :- दरवर्षी ०१ ऑक्टोंबर हा दिवस जागतिक ज्येष्ठ नागरीक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून आज लातूर जिल्हा क्रिडा संकुल येथे सकाळी समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालय, सह्याद्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आणि अपोलो मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलच्यावतीने जेष्ठ नागरिकांचे आरोग्य तपासणी शिबीर झाले. तसेच समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयात आधारवड कृतज्ञता सोहळा झाला. या दोन्ही कार्यक्रमांना ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आरोग्य शिबिरामध्ये ११२ जेष्ठ महिला व पुरुष यांनी सहभाग नोंदवून आरोग्याची तपासणी करून घेतली. या आरोग्य तपासणी शिबीरामध्ये रक्तदाब, मधुमेह, हृद्यरोग इत्यादी तपासण्या करण्यात आल्या. सह्याद्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक हनुमंत किणीकर, अपोलो मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. मनोज कदम, डॉ. गिरी दोन्ही हॉस्पिटलमधील यांच्यासह परिचारिका, फार्मासिस्ट व इतर कर्मचारी आणि समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयातील कर्मचारी यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव प्रकाश धादगीने होते. समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त तेजस माळवदकर यावेळी उपस्थित होते. श्री. देवसटवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यामध्ये त्यांनी जेष्ठांसाठी शासनाचे अधिनिमय, शासन निर्णयाची व जेष्ठांच्या योजनाची माहिती दिली.

जेष्ठ नागरिकांचा सत्कार व कृतज्ञता सोहळा

या कार्यक्रमामध्ये विविध क्षेत्रातील उपस्थित ३० जेष्ठ नागरिक यांचा आधारवड कृतज्ञता सोहळा म्हणून मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. आशिष चेपुरे यांनी जेष्ठांच्या आरोग्याविषयी माहिती दिली. तसेच जेष्ठांनी नियमित व्यायाम करणे, सकस आहार घेणे याबाबत मार्गदर्शन केले. जेष्ठ नागरिक कार्यकारणी समितीचे सदस्य बी.आर.पाटील यांनी जेष्ठांना येत असलेल्या अडीअडचणी मांडल्या.

समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, दक्षिण मराठवाडा प्रादेशिक विभाग ज्येष्ठ नागरिक संचाचे अध्यक्ष दामोदर थोरात, सचिव जगदीश जाजू, दक्षिण मराठवाडा प्रादेशिक विभागाच्या महिला आघाडी अध्यक्ष माया कुलकर्णी, लातूर जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष आर.बी.जोशी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुण धायगुडे यांनी केले. नागेश जाधव यांनी आभार मानले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE